# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग
### संचालनालय, लेखा व कोषागारे
**ठाकरसी हाऊस,३ रा मजला,मुंबई पोर्ट ट्रस्ट,**
**जे. एन.हेरेडिया मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१**

**दूरध्वनी क्र.२२६२२०२९/२०३६/६२९१** E-mail- aao.prashakosha-mh@gov.in


---

क्र. संलेको २०२०/प्रशा.कोषा/कार्या.८/अधिसंख्य पदनिर्मिती/६३२ दि.०२.०९.२०२०

प्रति,

१. अधिदान व लेखा अधिकारी,
अधिदान व लेखा कार्यालय, वांद्रे

२. सहसंचालक,
लेखा व कोषागारे,
कोकण/ पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय : अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा विषयक बाबींबाबत

संदर्भ :

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र. ३०८/१६-ब , दि. २१.१२.२०१९
२. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.२०३/कोषा ( प्रशा-३), दि. १२.०२.२०२०
३. सामान्य प्रशासन विभाग यांची दि.०७.०२.२०२० रोजीची टिप्पणी
४. संचालनालयाचे पत्र क्र. संलेको/प्रशा-कोषा/कार्या-१/प्र.क्र. ..../२०१९/४२५, दि. १२.०६.२०२०
५. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी २०१९/प्र.क्र.५८१/१६-ब, दि. १२.०६.२०२० व समक्रमांकित शासन निर्णय दि.१५.०६.२०२०
६. सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती यांचे पत्र क्र. ससंलेको/अम/आस्था-१/कार्यालयीन आदेश/२४/२०२०, दि. २३.०६.२०२०
७. सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर यांचे पत्र क्र. आस्था-३/कोवि-१६/अधिसंख्य पदे/सेवाविषयक बाबी/२०२०/११५, दि. २४.०७.२०२० व समक्रमांकित पत्र जा.क्र.११९६, दि.०५.०८.२०२०
८. सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोंकण यांचे पत्र क्र. ससंलेको/कोवि/आस्था/टि.स.३/न.क्र.१५/१०६६, दि. १०.०८.२०२०

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने वरील संचालनालयाकडुन निर्गमित करण्यांत आलेल्या संदर्भ क्र.४ वरील दि.१२.०६.२०२० रोजीचे पत्र रद्द समजण्यांत यावे.

उपरोक्त संदर्भ क्र. ५ वरील सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १२.०६.२०२० व समक्रमांकित दि.१५.०६.२०२० नुसार अधिसंख्य पदावर नेमणूक दिल्यानंतर त्यांना नियमित कार्यरत असणा-या अधिकारी व कर्मचा-यांप्रमाणे आश्वासित प्रगती योजना, पदोन्नती, वार्षिक वेतनवाढ, सेवानिवृत्ती वेतन, कुटुंब सेवानिवृत्ती वेतन, अनुकंपा तत्वावरील नियुक्ती यासारखे व इतर सेवाविषयक लाभ देण्यात यावेत किंवा कसे ? याबाबत सविस्तर अभ्यास करून शासनास शिफारशी करण्यासाठी मा.मंत्री ( अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण ) यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र अभ्यास गटाची स्थापना करण्यात आलेली असुन सदर अभ्यास गटाने आपल्या शिफारशी तीन महिन्यांत शासनास सादर करण्याबाबत नमूद केलेले आहे. त्यामुळे शासनाकडुन याबाबतचे अंतिम निर्णय प्राप्त झाल्यानंतर अधिसंख्य पदावर नियुक्ती देण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना सेवाविषयक / सेवानिवृत्तीविषयक लाभ प्रदानाबाबतची योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

उपरोक्त संदर्भ क्र. ६ ते ८ वरील पत्रानुसार अधिसंख्य पदावरील कर्मचा-यांच्या सेवाविषयक उपस्थित मुद्दयांबाबत शासन स्तरावरून मार्गदर्शन प्राप्त करून घेण्यात येत आहे. सोबत प्रस्तावाची प्रत जोडण्यांत येत आहे. तरी शासनाकडुन प्राप्त मार्गदर्शनानंतर निर्णय कळविण्यांत येईल.

(ज. र. मेनन)
संचालक ,
लेखा व कोषागारे, मुंबई

प्रत-१. लेखा अधिकारी, (र.व का.शाखा), संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांना माहितीसाठी.

G:\2020\31.08.2020\अधिसख्य पदे प्रस्ताव\2020- अधिसंख्य सेवा बाबी वि.स.स.पत्र.docx